Office of the Supdt. Of Police, Amravati Rural
**पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांचेकार्यालय.**
कॅम्प रोड, अमरावती- 444602
दुरध्वनी क्रमांक- 0721-2665800 फॅक्स क्रमांक- 0721-266553
ई-मेल आयडी- sp.amravati.r@mahapolice.gov.in

पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांचे आस्थापनेवरील पोलीस भरती-2021

# -चालक पोलीस शिपाई उमेदवारांकरीता महत्वाची सुचना-

अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर पोलीस शिपाई चालक यांचे 41 रिक्त पदाकरिता (पुरुष व महिला) जाहिरातीमध्ये निर्गमीत सुचनेनुसार कागदपत्रे पडताळणीचे अधिन राहून पोलीस शिपाई चालक भरती-2021 मधील उमेदवारांची तात्पुरती (Provisional) निवड यादी आणि तात्पुरती (Provisional) प्रतिक्षायादी याव्दारे www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर आणि अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस घटकाचे अधिकृत संकेतस्थळ https://amravatiruralpolice.gov.in/ वर तसेच जोग स्टेडीयम, मालटेकडीचे बाजूला, अमरावती येथील नोटीस फलकावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**पोलीस शिपाई चालक पदाकरीता** 41 उमेदवारांची तात्पुरत्या निवड यादी तात्पुरत्या स्वरुपात जाहिरातीमध्ये निर्गमीत सुचनेनुसार कागदपत्रे पडताळणीचे अधिन राहून तयार करण्यात आली आहे. **सदरहु उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीकरीता मंथन हॉल, पोलीस मेस चे बाजूला, जोग स्टेडीयमचे बाजूला, अमरावती येथे दिनांक 24.04.2023 रोजी सकाळी 08:00 वाजता शैक्षणिक सर्व मुळ कागदपत्रे आणि त्यांच्या छायांकित प्रतीसह हजर राहावे. सोबत येतांना मुळ कागदपत्रांसह 10 वी/12 वी उत्तीर्ण अर्हता, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्र, मुळ आधार कार्ड, समांतर आरक्षणाची (खेळाडु, माजी सैनिक उमेदवारांचे डिस्चार्ज प्रमाणपत्र, गृहरक्षक दलाकरीता आवश्यक असलेले प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, भूकंपग्रस्तांचे प्रमाणपत्र, पोलीस पाल्य प्रमाणपत्र, अंशकालीन प्रमाणपत्र, इडब्लूएस प्रमाणपत्र, एनसीसी प्रमाणपत्र, अनाथाबाबतचे प्रमाणपत्र, महिला आरक्षणाचे 30 टक्के बाबतचे फ प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे), संगणक अर्हता, वाहन चालविण्याचा मुळ परवाना (लायसंस) आणि इतर आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रांसह दिलेल्या ठिकाणी हजर राहावे.**

**तसेच मैदानी चाचणी चे वेळी व लेखी परिक्षेचे वेळी महाआयटी कडुन निर्गमीत केलेले ऑनलाईन ओळखपत्र सोबत आणावे. उमेदवारांनी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. तसेच कागदपत्रांची छायांकित प्रती सोबत आणाव्या, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

अमरावती

दि.21.04.2023

**(अविनाश बारगळ) भा.पो.से.**
पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण